**<u>नि. दि. दा. क्र. ११४/२०२१</u>**

( शोभा टोंगळे वि. सोमनाथ कडबाने वगैरे)

## निशाणी क्र. २३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी म्हणणे व कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होऊन म्हणणे व कैफियत स्विकारण्यात यावी यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने कडे प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. २४ कडे प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०२) प्रतिवादी क्र. १ चे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत प्रतिवादी दिनांक २१/०९/२०२२ ते २४/०९/२०२२ या काळात आजारी असल्याने व त्यानंतर आजारातून आलेल्या अशक्तपणामुळे तो म्हणणे व कैफियत दाखल करुन शकला नाही. त्यामुळे म्हणणे व कैफियत देण्यास सुमार ३४ दिवसांचा विलंब झाला आहे. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा आहे. सदरचा विलंब या प्रतिवादीने जाणूनबुजून केलेला नाही. त्यामुळे या प्रतिवादी क्र. १ याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३) वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जात नमुद हे खरे व कायदेशिर नसून काल्पनिक स्वरुपाचे आहे असे कथन केले आहे व प्रस्तुचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४) वादीतर्फे वकील श्री. बागल आणि प्रतिवादी क्र. २ तर्फे वकील श्री. जहागिरदार यांचा युक्तीवाद ऐकला.

०५) दावा, अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. सबब, दाव्याचा गुणावगुणावर निकाल होण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रतिवादीला त्याचा बचाव दाव्याच्या गुणदोषावर निकाल होण्यासाठी दाखल करण्याची परवानगी देणे उचित आहे. अर्ज मंजूर केलेस वादीचे नुकसान होणार नाही. मात्र नामंजूर केलेस या प्रतिवादीचे

नुकसान होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज  मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. १ यांना म्हणणे व कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब या प्रतिवादींनी वादीला रक्कम रुपये २००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

०३. प्रतिवादी क्र. १ यांनी कॉस्टची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

०४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2022.12.20 23:54:42 +0530

(एम. आर. कामत )

दिनांकः- १४/१२/२०२२.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | 3rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Name of Stenographer | : | S. M. Shaikh. |
| Date | : | 14/12/2022. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 14/12/2022. |
| Judgment/Order uploaded on | : | 21/12/2022. |